लोकमत ५-५-१.

# कचरागाड्यांविरोधात डोंगरीवासीय आक्रमक

## वाहने पकडून देण्याची सुरू केली मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क


मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेच्या कचरा वाहून नेणाऱ्या ठेकेदाराकडील कचरागाड्या नादुरुस्त, गळक्या तर काहींना फिटनेस प्रमाणपत्र नसल्याने अपघात वाढल्याच्या घटनांमुळे डोंगरी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. त्यांनी अशा गाड्या पकडून देण्याची मोहीम सुरू केली असून, वाहतूक पोलिसांनीदेखील कारवाई सुरू केली आहे.

शहराचा कचरा उत्तनच्या धावगी डोंगरावर टाकला जातो. ठेकेदाराच्या कचरा वाहून नेणाऱ्या गाड्यांमुळे या भागात सातत्याने अपघात होत आहेत. तत्कालीन नगरसेवक शर्मिला बगाजी यांनी याबाबत सतत तक्रारी चालवल्या होत्या, तर यातील अनेक गाड्यांचे फिटनेस प्रमाणपत्र नसल्याची गंभीर बाब ठाकरे गटाच्या युवासेनेचे शहर अधिकारी पवन घरत यांनी उघडकीस आणून यावर कारवाईसाठी लोकायुक्तांपर्यंत तक्रार केली आहे.

वाहनचालक सुसाट व बेदरकारपणे गाडी चालवत असल्याने गाड्यांचे अपघात घडले आहेत. त्यातच कचरा वाहून नेताना गळक्या व नादुरुस्त गाड्यांमुळे चिकट द्रव रस्त्यावर सांडून दुचाकी घसरण्याच्या घटना घडल्या आहेत. अपघातात अनेक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे अशा कचरागाड्यांवर आता डोंगरी भागातील ग्रामस्थानी आक्रमक भूमिका घेत गळक्या गाड्या अडवून त्याची तक्रार उत्तन पोलिसांकडे सुरू केली आहे.

### कठोर कायदेशीर कारवाईची मागणी

फिटनेस प्रमाणपत्र नसलेल्या, नादुरुस्त व गळक्या कचरा गाड्या जीवघेण्या असून, पोलिसांनी तसेच आरटीओने त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी फ्रिडा मोरायस, डेव्हिड नून आदींनी केली आहे, तर पोलिसांनी अशा गाड्यांवर कारवाई सुरु केली आहे, असे वाहतूक पोलिस निरीक्षक देवीदास हंडोरे यांनी सांगितले.



कचरा वाहून नेणाऱ्या गाड्या नादुरुस्त, गळक्या असल्याने अपघात वाढले असून संतप्त डोंगरी ग्रामस्थांनी अशा गाड्या पकडून देण्याची मोहीम सुरु केली आहे.

म.टा. ५-५-१.

# नालासोपाऱ्यात व्यापाऱ्याला मारहाण

म. टा. वृत्तसेवा, वसई

नालासोपाऱ्यात एका व्यापाऱ्याला आठ ते १० जणांनी मारहाण केल्याची घटना शुक्रवारी घडली. त्याची सुटका करण्यासाठी गेलेल्या त्याच्या पत्नीलाही मारहाण करण्यात आली आहे.

नालासोपारा पूर्वेकडे बॉम्बे नॉव्हेल्टी नावाचे जनरल स्टोअरचे दुकान आहे. शुक्रवार, १४ एप्रिल रोजी एक अज्ञात व्यक्ती सायंकाळी सात वाजता दुकानात येऊन लहान मुलांचे खेळण्याचे युनो कार्ड खरेदी करून निघून गेली. मात्र रात्री १० वाजताच्या सुमारास ती व्यक्ती परत आली आणि तिने दुकानमालकाशी बाचाबाची केल्यानंतर त्याला मारहाण करू लागली. त्यानंतर या व्यक्तीसोबत असलेल्या आठ ते १० जणांनी व्यापाऱ्याला मारहाण केली. पतीला मारत असल्याचे पाहत पत्नीने पतीला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यावेळी जमावातील व्यक्तींनी तिलाही मारहाण केली. देवाराम चौधरी (३८), गजरोदेवी चौधरी (३६) असे मारहाण झालेल्या व्यापारी आणि त्याच्या पत्नीचे नावे आहे. यात व्यापारी पती जबर जखमी झाला असून त्याच्यावर नालासोपारा पूर्वेकडील आयकॉन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत आचोळे पोलिस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल झाला असून मारहाण करणारे अद्याप फरार आहेत.

Scanned with CamScanner

सकाळ पु.पा.२.

# घरफोडी करणारे दोन सराईत चोरटे अटक

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : वसईच्या वालीव हद्दीत घरफोडी, चोरी करून फरार होणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना अटक करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. चोरट्यांनी वालीव पोलिस ठाण्यातील १० गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

आरोपींकडून तीन लाख ४२ हजार रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. भावेश महेश वेदक (वय २२) आणि बद्रीआलम आखलाक चौधरी ऊर्फ पप्पू (वय ३०) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नाव आहेत. या चोरट्यांनी वालीव पोलिस ठाणे हद्दीत चोरी, घरफोडी करण्याचा सपाटा लावला होता. गुन्ह्याची पद्धत लक्षात घेऊन घटनास्थळावरील सीसीटीव्ही व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे वालीवचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास बर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

गुन्हे शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक राहुल पाटील, सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश फडतरे यांच्या पथकाने सापळा रचून वसईच्या चिंचपाडा आणि सातीवलीच्या मौर्यानगर येथून या आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींची कसून चौकशी केली असता त्यांनी वालीव पोलिस ठाण्यातील १० गुन्ह्यांची कबुली दिली. चोरीस गेलेले तीन लाख ४२ हजार किमतीचे सोने-चांदीचे दागिनेही पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

लोकमत पु.पा.१.

# नवघर पोलिसांनी मिळवून दिला १६ लाखांचा मुद्देमाल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीत नागरिकांचे गहाळ झालेले मोबाइल, चोरी गेलेल्या गाड्या तसेच फसवणुकीत गेलेली रक्कम असा १० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल सोमवारी संबंधित नागरिकांना पोलिसांनी परत केला. चोरीला गेलेल्या वस्तू परत मिळाल्याने लोकांनी आनंद व्यक्त करीत पोलिसांचे आभार मानले.

नवघर पोलिस ठाण्यात परिमंडळ-१चे उपायुक्त जयंत बजबळे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय पवार, पोलिस निरीक्षक प्रकाश मासाळ व सुशीलकुमार शिंदे, सहायक निरीक्षक योगेश काळे, उपनिरीक्षक अभिजित लांडे आणि गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अंमलदार आदींच्या हस्ते ऐवज नागरिकांना परत केला.

नवघर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांमधील गहाळ झालेले विविध कंपन्यांचे तीन लाख १० हजारांचे ४१ मोबाइल, दोन लाख ४२ हजार किमतीच्या चोरीस गेलेल्या सहा दुचाकी आणि एक रिक्षा संबंधितांना परत केली. फसवणूक व अपहार केलेली दहा लाख २८ हजार रुपयांची रोख रक्कमसुद्धा हस्तगत करून नागरिकांना परत केली. यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर हसू फुलले.

Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. ९

# विरारमध्ये जल आक्रोश मोर्चा

## पाणी समस्येमुळे रहिवासी आक्रमक; पाण्यासाठी वणवण सुरूच

वसई, ता. १७ (बातमीदार) : वसई-विरार शहरातील नागरिकांना सातत्याने भेडसावणारी पाणी समस्या व महापालिकेच्या थातुरमातुर उत्तरांना कंटाळून नागरिकांनी विरार पश्चिम जुना जकात नाका ते म्हाडा असा जल आक्रोश मोर्चा काढला. यावेळी खासदार राजेंद्र गावित उपस्थित होते.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. सतत जलवाहिनीतून पाण्याची होणारी गळती, पाणीपुरवठा खंडित होणे, यामुळे नागरिकांचा संताप व रोष निर्माण होत आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते मयुरेश वाघ यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी 'जल आक्रोश मोर्चा' काढला. रणरणत्या उन्हातही मोठ्या संख्येने नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी जल आक्रोश सभादेखील घेण्यात आली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी पाण्याची समस्या मार्गी लावण्याची निवेदनातून मागणी केली आहे. याप्रसंगी महापालिकेकडून उपायुक्त डॉ. किशोर गवस, उपायुक्त तानाजी नारळे, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे व सुरेंद्र ठाकरे व अन्य अधिकाऱ्यांनी नागरिकांचे म्हणणे ऐकून उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिले.

वसई-विरार शहराच्या मागणीनुसार रोज ३२६ दशलक्ष लिटर पाण्याची गरज आहे; मात्र सद्यस्थितीत २३० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे. त्यातच झडपांमधून पाणीगळती, जलवाहिनी फुटणे यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. यामुळे शहरात मोठी पाणीटंचाई भासत आहे.

एमएमआरडीएच्या योजनेचे पाणी शहरात आल्यानंतर ग्लोबल सिटी, गोकुळ टाऊनशिप, दिवेकर हॉस्पिटल परिसर, फुलपाडा, मनवेलपाडा येथे नवीन जलकुंभ सुरू करून पाणीपुरवठा केला जाईल.
- सुरेंद्र ठाकरे, उपअभियंता, पाणी विभाग

वसई-विरार शहराची पाणी समस्या दूर केली जाईल. पाणी योजनेतील १८५ एमएलडी पाणी वसई-विरारला मिळणार आहे. मेपर्यंत पाणी देण्याचे आश्वासन महापालिकेकडून देण्यात आले आहे.
- राजेंद्र गावित, खासदार

शहरात पाणी समस्येने उग्र रूप धारण केले आहे. अशात जलवाहिनीमध्ये सातत्याने बिघाड होत आहेत. याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. या मोर्चाच्या माध्यमातून नागरिकांचा आक्रोश प्रशासनासमोर मांडला आहे. त्यामुळे पालिकेने याची दखल घेऊन मुबलक पाण्याची व्यवस्था करावी.
- मयुरेश वाघ,
सामाजिक कार्यकर्ते

### दररोज २१ टक्के पाणी वाया

वसई-विरारमध्ये पाणीगळतीची समस्या मोठ्या प्रमाणात असून रोज २१ टक्के पाणी वाया जात आहे. याचा परिणाम वितरणावर होत आहे. त्यामुळे अनेक भागांत पाणी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. वसई-विरार शहरात अनेक ठिकाणी पाणी वितरणासाठी वसवण्यात आलेल्या झडपा या रस्त्याच्या मधोमध आहेत. त्यामुळे वाहनांचा भार पडल्याने त्यात बिघाड होत आहे. यामुळे पाणीगळती होत आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याचे नियोजन करताना वाया जाणाऱ्या पाण्याकडे लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

---

पुढारी पा. नं. ७.

# पत्नीच्या वहिनीशी विवाहबाह्य संबंध

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

पत्नीच्या वहिनीसोबत विवाहबाह्य संबंध ठेवल्याची घटना भाईंदरमध्ये उघडकीस आली आहे. या प्रकरणी विवाहितेने दिलेल्या तक्रारीनुसार नवरा आणि तिच्या भावाच्या बायकोविरुद्ध भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिमेस राहणाऱ्या समता (बदलेलेले नाव) हिची २०१५ ला मोहित वर्मा (बदलेलेल नाव) याच्याशी ओळख झाली. त्यानंतर प्रेमसंबंधातून २०२० साली त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर थोडे दिवस चांगले गेले.परंतु काही दिवसानंतर मोहित हा रात्री-अपरात्री फोनवर कोणाशी तरी बोलायचा तसेच नेहमी घरी उशिरा येऊ लागला. त्याला त्याच्या पत्नीने विचारले असता त्या कारणावरून शिवीगाळ व मानसिक छळ करू

## पतीसह वहिनीविरुद्ध गुन्हा दाखल

लागला. त्यामुळे समता हिला काही समजत नव्हते. त्यानंतर काही दिवसांनी मोहितने समता हिला माहेरी पाठवून दिले. त्यानंतर काही दिवसांनी पुन्हा तिला घरी आणले. असे एक दोन वेळेस झाले. परंतु तो सुधारेल यामुळे ती सहन करत होती.

मोहित हा दिल्लीला काम आहे, असे सांगून जयपूर येथे फिरण्यासाठी जात असल्याची माहिती समता हिला मिळाली. त्याची पूर्ण चौकशी केल्यानंतर मोहित हा एका महिलेबरोबर फिरत असल्याचे तिला समजले. दरम्यान, २०२१ मध्ये समताला मोहितचे तिच्या भावाच्या पत्नी सुनिता (बदलेलेल नाव) हिच्याशी विवाहबाह्य संबंध असल्याचे व्हॉट्सॲप चॅटवरून समजले. त्यानंतर नोव्हेंबर २०२२ मध्ये मोहित व समताच्या भावाची बायको यांना भाईंदरच्या एका लॉजमध्ये समताने रंगेहाथ पकडल्यानंतर त्या दोघांनी विवाहबाह्य संबंध असल्याचे कबूल केले. नंतर मोहित याने माफी मागितली आणि घरच्यांनी समजूत काढल्यावर दोघांचा संसार पुन्हा सुरू झाला. त्यानंतर काही दिवसांनी समताला मोहित व तिच्या भावाची पत्नी सुनिता यांनी २०२० साली मंदिरात लग्न केल्याची छायाचित्रे सापडली. त्यामुळे समता व मोहित यांच्या लग्न होण्याच्या अगोदरपासून संबंध होते तसेच त्यांनी लग्न केले होते. असे असताना फसवणूक केली आहे. त्यामुळे मोहित व सुनिता यांच्याविरुद्ध भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु.पा.४


# अपहरण करणाऱ्यांना काही तासांत अटक, महिलेची सुटका

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या तलाव रोड परिसरातून दोन अज्ञात व्यक्तींनी रविवारी २८ वर्षीय महिलेचे अपहरण केल्याची घटना घडली होती. नवघर पोलीस ठाण्यात याप्रकरणी दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून काही तासांतच दोन आरोपींना अटक करून महिलेची सुटका केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत शिल्पा पुजारी रविवारी सायंकाळी ६ च्या सुमारास वडिलांसोबत पायी घरी जात असताना तलाव रोड पोलीस चौकीसमोर तिच्या ओरडण्याचा आवाज आला. वडिलांनी पाठीमागे वळून बघितले असता एक अनोळखी व्यक्ती तिचा हात पकडून खेचून घेऊन जात होता. तिची सुटका करण्यासाठी वडिलांनी पाठलाग केला. त्यावेळी तेथे असलेल्या दुसऱ्या अनोळखी व्यक्तीच्या दुचाकीवर तिला बसवून पळवून घेऊन गेले होते. वडिलांनी शिल्पाचा शोध घेतला; परंतु ती कुठेही सापडली नाही. याबाबत वडिलांनी नवघर पोलीस ठाण्यात मुलीच्या अपहरणाची तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपींना वांद्रे येथून अटक केली.

# बिटकॉइनचे आमिष दाखवून ऑनलाइन फसवणूक

## उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा, तब्बल पाच लाख रुपयांना गंडा



वेनडी चॅम्पमन या इन्स्टाग्राम अकाउंटधारकाने ई-मेल पाठवणारे, वेबसाईट चालक त्यावरून लोकांना पैशाचे आमिष दाखवुन फसवणूक करणारे, फसवणुकीच्या उद्देशाने बोगस ई-मेल, टेक्ट मॅसेज व फोन करणारे, फेसबुक, इन्स्टाग्राम व सोशल मिडिया अकाऊंटवर बोगस लिंक्स, वेबसाईट पाठवणारे, फसवणुकीचे पैसे घेण्यासाठी वेगवेगळे बँक खाते वापर करणारे, फसवणुकीचे पैसे वेगवेगळ्या बँक खात्यावरून ट्रान्फर करणारे, या सर्वांच्या विरोधात उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मीरा रोड :** उत्तन येथील ललित रमेश चव्हाण यांना बिटकॉइनमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवून ५ लाख २० हजारांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. ललित चव्हाण यांना १२ मार्च रोजी इन्स्टाग्राम अकाउंटवर वेनडी चॅम्पमन या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून मॅसेज आला की, अमेरिकेत राहत असून मी बाईनरी ट्रेडर आहे. तुम्ही बिटकॉईनमध्ये पैशांची गुंतवणूक करून तीन तासात चांगले पैसे कमावू शकता. ४० हजार भरले तर ३ लाख ९० हजार रक्कम परतावा मिळतो. ही गुंतवणूक गुगल पे, फोनपे, पेटीएम अशा कोणत्याही मार्गाने करता येते, असे प्रलोभन दाखवण्यात आले.

यावर विश्वास ठेवून ललित यांनी ट्रेडींग व्यवसाय करण्यास सुरुवात केली. नंतर त्यांनी ४० हजार रुपये गुंतवले. ट्रेडींग अकाऊंट लॉगिंग केले असता, त्यांच्या अकाऊंटवर ४ लाख ९ हजार रक्कम दिसत होती. परंतु ती रक्कम तीन तास झाले तरी काढता येत नव्हती. रक्कम केव्हा काढता येणार याची विचारणा केली. तेव्हा तुमचे ट्रेडींग अकाऊंट अपग्रेड करावे लागेल. त्यासाठी पैसे भरण्यास सांगितले. वेबसाईटवर ट्रेडींग अकाउंट रजिस्टर करण्यासाठी, तसेच ते ट्रेडींग अकाऊंट अपग्रेड करण्यासाठी वेगवेगळ्या बँकखात्यावर पैसे भरण्यास सांगून ते भरलेले पैसे, त्याबदल्यात नफा परत न करता ५ लाख २० हजार रुपयाची फसवणूक केली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.१९४.


# पुण्यातील शाळेत मुस्लिम तरुणांना दहशतवादी शिक्षण; २ मजले 'सील'

## राष्ट्रीय तपास संस्थेची 'पीएफआय'वर कारवाई

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशात हत्याकांड घडवून आणण्यासाठी तसेच एका विशिष्ट समाजाच्या संघटना आणि नेत्यांवर हल्ले करण्यासाठी मुस्लिम तरुणांना पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेकडून प्रशिक्षण देण्याचे काम पुण्यातील एका शाळेत होत असल्याची धक्कादायक बाब राष्ट्रीय तपास यंत्रणेला आढळून आली. त्यानंतर या यंत्रणेने वेगाने हालचाली करीत या शाळेचे दोन मजले सील करण्याची कारवाई केली.

पुण्यातील कोंढवा परिसरातील अश्रफनगर येथे ब्ल्यू बेल या शाळेतील चौथा आणि पाचवा मजला या प्रशिक्षण शिबिरासाठी वापरण्यात येत




होता, अशी माहिती राष्ट्रीय तपास यंत्रणेला मिळाली. या कारवायांमुळे देशाचे ऐक्य, सार्वभौमत्व आणि सुरक्षा धोक्यात येत असल्याचे स्पष्ट झाले. पॉप्युलर /...४

# पुण्यातील शाळेत मुस्लिम तरुणांना दहशतवादी शिक्षण; २ मजले 'सील'

**पान १ वरून...** फ्रंटकडून तरुणांची दिशाभूल करून त्यांना संघटनेमध्ये सामील करून घेण्यात येत होते. त्यानंतर त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देण्याचे काम संघटनेकडून सुरू होते. देशात २०४७ पर्यंत इस्लामिक राजवट प्रस्थापित करण्यास विरोध करणाऱ्या घटकांवर हल्ला करण्याची चिथावणी या तरुणांना देण्यात येत होती, असे 'एनआयए'च्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

ब्ल्यू बेल या शाळेच्या दोन मजल्यांची तपासणी गेल्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यात तपास यंत्रणेने केली. अनेक कागदपत्रांची छाननी करण्यात आली. त्यातून या शाळेचा वापर शस्त्रांचे प्रशिक्षण देण्यासाठी आरोपींकडून करण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. तरुणांना चिथवून त्यांचा वापर सरकार, एका विशिष्ट धर्मांचे नेते आणि संघटनांविरुद्ध करण्याचा हेतू या संघटनेचा होता, असे स्पष्ट झाले आहे. देशात इस्लामिक राजवट प्रस्थापित करण्याच्या संघटनेच्या हेतूला विरोध करणाऱ्यांवर हल्ला करण्यासाठी तसेच त्यांचा खून करण्यासाठी सुरे, विळे आदी घातक शस्त्रांच्या वापराचे प्रशिक्षण या शाळेत दिले जात होते. आरोपपत्र दाखल करण्यात आलेल्या आरोपींमध्ये पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. याबाबत राष्ट्रीय तपास यंत्रणा पुढील तपास करीत असून या कटात आणखी कोण सामील आहे, याचा शोध घेतला जात आहे.

● बेकायदा कारवायांना प्रतिबंध करणाऱ्या कायद्यातील तरतुदींनुसार या शाळेचे दोन मजले यंत्रणेने ताब्यात घेतले असून त्यांना सील करण्यात आले. याबाबत तपास यंत्रणेने १३ एप्रिल २०२२ रोजी नवी दिल्लीत गुन्हा नोंदवला आणि १८ मार्च २०२३ रोजी तपास यंत्रणेच्या विशेष न्यायालयासमोर वीस आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. त्यात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेचाही समावेश होता.

Scanned with CamScanner

पुढारी ५-५-२४.

# राष्ट्रीय महामार्गावर चोऱ्या करणाऱ्याला अटक

## वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या कारवाईमुळे ३ गुन्ह्यांची उकल



**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर जबरी चोऱ्या करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली. सदर कारवाई वालीव पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण पथकाने केली. सरोज मारुफ आलम उर्फ मोनू (२६, रा. धानीव बाग, नालासोपारा पूर्व) असे आरोपीचे नाव आहे. हा आरोपी पोलिसांच्या हाती लागल्याने ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाहन चालकांना लुटणाऱ्या टोळीला वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. २१ मार्च २०२३ रात्री ०२.०० च्या सुमारास फिर्यादी मोहम्मद रिजवान मोहम्मद फारुख अन्सारी हे ओला कारने नालासोपारा फाटा येथुन गोल्डन चॅरिएट हॉटेल जवळ आले असता त्यांना अंदाजे २० ते २५ वर्षे वयोगटाचे दोन इसम भेटले व त्यांनी फाऊंटन येथे सोडण्यास सांगितले असता अन्सारी हे त्यांना घेऊन सातीवली ब्रिज जवळील सर्व्हिस रोडवर, सातीवली, वसई पूर्व येथे आले असता त्यांचा मित्र येत असल्याने गाडी बाजुला घेण्यास सांगितले. त्यानंतर अन्सारीच्या गाडीत बसलेल्या एका इसमाने पाठीमागुन त्यांचा गळा पकडला व त्याचे कडील असलेला चाकु फिर्यादीच्या गळ्याला लावला व दुसऱ्या इसमाने अन्सारी यांच्या खिशातील एकुण २० हजार रोख रक्कम काढुन घेतली व त्यातील ५०० रु. फिर्यादीस परत देऊन पाठीमागुन आलेल्या एक लाल व काळ्या रंगाची डि.ओ. मोटार सायकल क्रमांक एम.एच.०५ बी.व्ही. ९०४२ यावर बसुन निघुन गेले. त्यानंतर अन्सारी यांनी त्यांचा पाठलाग केला. आता ते गुजरात मुंबई महामार्गावरील वासमोऱ्या ब्रिजजवळ दिसुन आल्याने फिर्यादीने त्याचे ताब्यातील गाडी त्यांचे मोटारसायकल समोर उभी केली असता आरोपींनी अन्सारी यांच्या गाडीला ठोकर मारल्याने त्यांची मोटारसायकल खाली पडली व ते मोटारसायकल सोडुन सदर ठिकाणाहुन पळुन गेले. याबाबत वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तात्काळ उकल करण्याच्या सूचना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिल्या. त्यानुसार वालिव गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज व खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे आरोपी सोनू याच्या मुसक्या आवळल्या. सोनू याने आसीफ उर्फ मव्वा अकील अहमद, अब्दुल उर्फ कट्टा यांच्या मदतीने गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले.

Scanned with CamScanner

पुढारी पु. प. ३.

# केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, बिस्वेश्वर टुडू यांचा पालघर लोकसभा मतदारसंघात दौरा

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशाच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले अनेक महत्त्वपूर्ण निर्णय व जनकल्याणकारी योजना यांचा देशभर प्रचार व प्रसार करणे. तसेच मजबूत पक्षबांधणी करणेसाठी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने लोकसभा प्रवास योजना हे अभियान सुरू केले आहे. त्यासाठी प्रत्येक केंद्रीय मंत्र्यावर एक एका लोकसभा क्षेत्राची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर व जलसंधारण व आदिवासी विकास राज्यमंत्री बिस्वेश्वर टुडू आज मंगळवार दि.१८-४-२०२३ रोजी पालघर लोकसभा क्षेत्राचा दौरा करणार आहेत.

शिरसाट फाटा येथील महावीरधाम येथील सभागृहात. दुपारी २.३० ते ३ या वेळेत सोशल मिडिया व लाभार्थी संदर्भात काम करणाऱ्या भाजपा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतील. त्यानंतर ३ ते ४ या वेळेत वसई व नालासोपारा विधानसभा क्षेत्रातील भाजपाच्या कोअर कमिटीच्या सदस्यांची बैठक घेतील. सदर बैठक पार पडल्यानंतर विरार येथे वसई विरार महापालिका आयुक्तांबरोबर सायं ५ ते ६ वेळेत महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या समस्यांसंदर्भात विचार विनिमय करतील. तद्नंतर लगेचच तिथे पत्रकारांशी संवाद साधतील. या दौऱ्यासाठी ,पालघर,लोकसभा प्रवास योजनेचे प्रमुख माजी आमदार नरेंद्र पवार, संयोजक तथा भाजपा पालघर जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील तसेच भाजपा वसई विरार जिल्हाध्यक्ष राजन नाईक व प्रमुख भाजपा पदाधिकाऱ्यांनी विधानसभा क्षेत्रांत अनेक बैठका घेऊन तयारी केली आहे अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख पुंडलिक भानुशाली, केदारनाथ म्हात्रे यांनी दिली.

पुढारी पु. प. २.

# भाईंदर येथे काँग्रेसचे जय भारत सत्याग्रह आंदोलन

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईंदर येथे काँग्रेसच्या वतीने जय भारत सत्याग्रह आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी घोषणा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर देण्याची मागणी करत भाईंदर येथील तहसीलदार कार्यालयाला घेराव घालत निवेदन देण्यात आले.

भाईंदर येथे आंदोलनावेळी माजी आमदार मुझफ्फर हुसैन म्हणाले की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेल्या ७५ वर्षातील भाजप सरकारच्या नऊ वर्षाच्या राजवटीत चुकीच्या धोरणांमुळे देश अधोगतीला गेला आहे. काँग्रेसने देश घडवला व मोठा केला परंतु आज देश एका उद्योगपतीच्या इशाऱ्यावर चालवला जात आहे हे दुर्दैव आहे अशी टीका हुसेन यांनी केली आहे. हुसैन पुढे म्हणाले की राहुल गांधींनी भारत जोडोच्या माध्यमातून देशवासियांना डरो मत चा संदेश दिला असून जे प्रश्न संसदेत विचारले तेच प्रश्न सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर उतरून विचारत आहेत परंतु मोदीजी हे उद्योगपती बद्दल काहीही बोलण्यास तयार नाहीत याचा अर्थ हा देश कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे, प्रश्न विचारला म्हणून राहुल गांधी यांचे संसद सदस्यत्व तडकाफडकी रद्द केले , ही लोकशाही नसून हुकूमशाही आहे ,आरक्षण हटवून मनुवादाला प्रोत्साहन देत समान नागरी कायदा आणण्याचा डाव आखला जात असल्याचे म्हणाले.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ४.

# ‘महाराष्ट्र भूषण’च्या आयोजकांवर गुन्हा नोंदवा

## विरोधी नेत्यांची मागणी; उद्धव ठाकरे, राज ठाकरे, अजित पवार यांची संतप्त प्रतिक्रिया; मृतांच्या नातेवाइकांना एक कोटी मदत द्या!

**पनवेल : विक्रम बाबर**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या दरम्यान झालेल्या दुर्घटनेला महाराष्ट्राचा सांस्कृतिक विभाग दोषी असून संबंधित विभागाच्या आयोजकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केली.

नागपूरला वज्रमूठ सभेसाठी गेलेले माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, अरविंद सावंत, विनायक राऊत तसेच विरोधी पक्षातील अन्य नेत्यांनी तातडीने मुंबईमध्ये येऊन एमजीएम रुग्णालयात उष्माघाताने बाधित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची भेट घेऊन विचारपूस केली. दरम्यान, सोमवारी सकाळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तर सरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एमजीएम रुग्णालयात उष्माघाताने बाधित रुग्णांची भेट घेतली.

**व्यवस्थापन चुकीचे : उद्धव ठाकरे**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमाची वेळ खराब होती आणि व्यवस्थापन चुकीचे होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सोयीनुसार कार्यक्रम दुपारचा झाला असेल तर कोण चौकशी करणार, असा प्रश्न उपस्थित करत अमित शहा यांना कार्यक्रमासाठी दुपारची वेळ हवी असेल तर ते दुर्दैव आहे, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

**खरा आकडा दडवत आहेत : अजित पवार**

विरोधी पक्षनेते अजित पवार म्हणाले की, कार्यक्रमाची वेळ खराब होती. ते म्हणाले की, ही घटना म्हणजे महाराष्ट्र भूषण कार्यक्रमावर काळा डाग आहे. दरम्यान, प्रशासन मृतांचा खरा आकडा पुढे आणत नसल्याचा आरोपही पवार यांनी केला आहे.

**सदोष मनुष्यवधाचा गुन्हा**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्या दरम्यान झालेल्या दुर्घटनेला महाराष्ट्राचा सांस्कृतिक विभाग दोषी असून संबंधित विभागाच्या आयोजकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवेंनी केली आहे.

**सरकारच्या हेतूची शंका : राज ठाकरे**

मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी सरकारच्या हेतूवरच शंका उपस्थित करून ते म्हणाले, हा प्रसंग टाळता आला असता तर बरे झाले असते. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार राजभवनावर देखील देता आला असता. इतक्या लोकांना बोलवून ही गोष्ट करण्याची आवश्यकता नव्हती. राज ठाकरे पुढे म्हणाले की, झाली ती गोष्ट दुर्दैवी आहे. याला कोणालाही जबाबदार धरता येणार नाही. ही कोणी ठरवून केलेली गोष्ट नाही.

**एक कोटींची मदत देण्याची मागणी**

दरम्यान, या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या श्री सदस्यांच्या नातेवाईकांना एक कोटी रुपयांची मदत देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली. आयोजकांच्या गैरनियोजनामुळे कळव्यातील दोघांसह १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून या दुर्घटनेची जबाबदारी सरकारला घ्यावीच लागेल, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांऐवजी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली.

**रेवदंडा शोकाकुल**

१३ श्री सदस्यांचा उष्माघाताने मृत्यू होण्याची दुर्दैवी घटना घडल्याबद्दल डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने शोक व्यक्त करण्यात आला असून पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकीरी यांच्या रेवदंडा येथील निवासस्थानी करण्यात आलेली सजावट देखील काढण्यात आली असून सर्वत्र शोकाकुल वातावरण आहे.

## अत्यंत क्लेशदायक घटना; आम्ही आपद्ग्रस्तांसोबत!

### पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांची सहवेदना; घटनेचे राजकारण न करण्याचे आवाहन

**अलिबाग : पुढारी वृत्तसेवा**



महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यासाठी खारघर येथे आलेले सारे श्री सदस्य हे माझ्या कुटुंबाचे सदस्य आहेत. रविवारी उष्माघाताने काहींचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही अत्यंत क्लेशदायक घटना असून आम्ही सर्वजण आपद्ग्रस्तांसोबत आहोत, अशी सहवेदना ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी सोमवारी लेखी निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.

श्री सदस्यांचा हा परिवार देश-विदेशात पसरला आहे. आपल्याच कुटुंबातील लोकांवर घाला येण्याच्या या घटनेने मी व्यथित आहे. माझे हे दुःख शब्दात व्यक्त करण्यापलीकडचे आहे, असे ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी म्हटले आहे.

**झालेला प्रकार दुर्दैवीच**

आम्ही सारेजण या आपद्ग्रस्तांसोबत कायम आहोत. यातील मृतांना सद्गती लाभो, तसेच त्यांच्या कुटुंबाला हा आघात सहन करण्याची शक्ती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. झाला प्रकार दुर्दैवीच होता. त्याचे कोणत्याही पद्धतीने राजकारण होऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे, असे डॉ. धर्माधिकारी यांनी अखेरीस म्हटले आहे.

समय भास्कर




# नवघर पुलिस ने लौटाया 17 लाख का समान

**पंकज दुबे/ मीरा-भाईंदर**

मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले नवघर पुलिस स्टेशन ने 17 अप्रैल को लगभग 17 लाख का सामान लोगों को वापस किये, यह सभी सामान चोरी, छीना- झपटी, और घर- फोडी जैसे मामलों में नवघर पुलिस ने बरामद किए थे, इनमें 6 दोपहिया वाहन, 1 ऑटो रिक्शा, और 41 मोबाइल फोन शामिल थे। यह सभी मामले वर्ष 2022 और 2023 के है, जो नवघर पुलिस स्टेशन में दर्ज हुए थे 7 इन सभी मामलों को सुलझाते हुये पुलिस ने इस कार्यक्रम का आयोजन किया जहां शिकायतकर्ता को परिमंडल 1 के पुलिस उपायुक्त जयंत बजबले की उपस्थिति में उनके सामान सुपुर्द किए गए । सामान मिलने पर नागरिकों ने पुलिस विभाग का आभार माना, कुछ ने कहां की हमने सोचा नहीं किया था कि, समान वापस मिलेंगे, पर नवघर पुलिस कि मदत से यह संभव हो पाया । इस अवसर पर पुलिस उपायुक्त जयंत बजबले, नवघर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विजय पवार, पुलिस निरीक्षक सुशीलकुमार शिंदे (क्राइम), पुलिस निरीक्षक प्रकाश माशाल, सहायक पुलिस निरीक्षक योगेश काले, पुलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे आदि उपस्थित थे ।

Scanned with CamScanner

दैनिक
# सनसनी अबतक
संपादक : विनोद कुमार तिवारी
RNI NO: MAHHIN/2010/34120
2₹
वर्ष :12 अंक 130 मुंबई, मंगलवार 18 अप्रैल 2023 पृष्ठ -4

# तुलिंज पुलिस स्टेशन को मिली सफलता!

## क्राइम डिटेक्शन टीम ने किया दो शातिर चोर को गिरफ्तार, 5 मामलो का पर्दाफाश

**सनसनी अबतक**

वसई : मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय की तुलिंज पुलिस स्टेशन को एक बड़ी सफलता मिली है। जिसमें क्राइम डिटेक्शन टीम ने दो शातिर चोरों को गिरफ्तार कर दर्ज 5 मामलो का पर्दाफाश की है। बताया गया है रिक्शा व मोटरसाइकिल चोरी करने के मामले में दोनो चोर पकड़े गए हैं। जानकारी यह भी सामने आया है कि चोर की गिरफ्तारी से पांच लाख से अधिक कीमत का वाहन भी जप्त किया है। बता दे यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल 2 ) की पोर्णिमा चौगुले श्रींगी व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में तुलिंज थाने के सीनियर पी.आई शैलेंद्र नगरकर, क्राइम डिटेक्शन के स.पो.नि.मिथुन म्हात्रे टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने सोमवार को दी है। पुलिस ने बताया कि विरार यातायात शाखा में पो.उप.नि. सूर्यवंशी द्वारा तुलिंज थाने में कार्यरत पो.हवा गोरे से संपर्क किया और सूचित किया कि फर्जी नंबर प्लेट लगाकर रिक्शा चलाते हुए शख्स मिला है।,जानकारी के




अनुसार तुलिंज थाना क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों व कर्मचारी ने मामले की जांच की,तो इस बीच उक्त रिक्शा की चोरी को लेकर तुलिंज थाने में मामला दर्ज किया गया है। उक्त रिक्शा व व्यक्ति शिशकुमार गुप्ता को हिरासत में लिया,यह ध्यान में आने के बाद,तुरंत अपराध का पता लगाने वाली टीम के अधिकारियों और कर्मचारी ने उस पर एक कुशल जांच की,उसने बताया कि उक्त रिक्शा उसने अपने दोस्त प्रकाश त्रिवेदी से लिया था,चोरी के दो और रिक्शा उसके और उसके दोस्त राकेश द्वारा विरार के शख्स को बेचे जाने की सूचना मिलने के बाद शिशकुमार गुप्ता नाम के शख्स को हिरासत में लिया गया और जांच की गई.उसके साथी प्रकाश त्रिवेदी उर्फ मारवाड़ी को तकनीकी विश्लेषण के जरिए ट्रेस कर मुंबई,अंधेरी से हिरासत में लेकर पूछताछ की गई.वह और उसका साथी (1). शिवकुमार हरिहर गुप्ता व (2).प्रकाश पोतराज त्रिवेदी को गिरफ्तार किया गया।दोनो आरोपियों विरार के रहने वाले है।पुलिस के मुताबिक,इनसे कुल 05 अपराधों का खुलासा हुआ जिनमें 02 तुलिंज थाना के अभिलेख पर तथा 03 विरार थाना के अभिलेख पर थे। इनके पास से 4 रिक्शा व 1 मोटरसाइकिल कुलमिलाकर 05,50,000 रुपये का माल जप्त किया गया है।

Scanned with CamScanner

दैनिक
# सनसनी अबतक
संपादक : विनोद कुमार तिवारी
RNI NO: MAHHIN/2010/34120
2₹
वर्ष :12 अंक 130 मुंबई, मंगलवार 18 अप्रैल 2023 पृष्ठ -4

## क्राइम डिटेक्शन टीम की कार्रवाई में पकड़ा गया नेशनल हाइवे का लुटेरा

सनसनी अबतक

**वसई :** मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय की वालीव पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने एक ऐसे शातिर लुटेरा को गिरफ्तार की है जो कि नेशनल हाईवे पर लूट को अंजाम देने में माहिर बताया गया है। बता दे कि यह सफलता डीसीपी (परिमंडल 2 ) पौर्णिमा चौगुले श्रीगी व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में पुलिस निरीक्षक कैलास वर्वे,पो.नि.राहुलकुमार पाटील (क्राइम) व क्राइम डिटेक्शन के सहायक पुलिस निरीक्षक ज्ञानेश फडतरे की टीम द्वारा मिला है। मामले की जानकारी देते हुए पुलिस ने बताया कि 21 मार्च को रात्रि लगभग 2 बजे के आसपास शिकायतकर्ता मोहम्मद रिजवान मोहम्मद फारुख अन्सारी है,जैसे ही वह अपनी ओला कार में नालासोपारा फाटा से गोल्डन चैरिएट होटल के पास पहुंचे, उनकी मुलाकात करीब 20 से 25 साल के दो लोगों से हुई। जब उन्होंने फाउंटेन पर छोड़ने के लिए कहा, तो शिकायतकर्ता उन्हें सातीवली पुल के पास सर्विस रोड पर सातीवली,वसई पूर्व ले गए। बताया गया है कि जैसे ही उसका दोस्त आ रहा था, उसने कार को एक तरफ ले जाने के लिए कहा, उसके बाद शिकायतकर्ता की कार में बैठी शख्स ने पीछे से शिकायतकर्ता का गला पकड़



लिया व चाकू शिकायतकर्ता की गर्दन पर लगा दिया, दूसरे शख्स ने शिकायतकर्ता की जेब में 20,000 रुपये कैश निकाल लिया व जिसमें से 500 रु.शिकायतकर्ता को वापस देकर पीछे से आ रही मोटरसाइकिल क्र.(एमएच 5-बी.जी 9042 ) पर बैठकर फरार हो गए। इस मामले में शिकायतकर्ता ने वालीव थाने में अज्ञात लुटेरे पर एफआईआर दर्ज करवाया था, पुलिस ने अज्ञात आरोपियों के ऊपर कलम 392,34 के तहत केस दर्ज कर आगे की जांच में जुटी थी। वालीव पुलिस की सीमा के भीतर मुंबई-अहमदाबाद राजमार्ग पर जबरन चोरी की घटना बढ़ रही है, ऐसे मे अपराध की गंभीरता को देखते हुए वरिष्ठों के मार्गदर्शन एवं सुझावों के बाद, प्राप्त अपराध स्थल का विवरण,तकनीकी विश्लेषण, सीसीटीवी फुटेज एवं गुप्त मुखबिरों से अपराध शाखा दल के अधिकारी एवं कर्मचारी ने आरोपी (1 ).सरोज मारूफ आलम उर्फ सोनु (26) को गिरफ्तार कर जांच की,वांछित आरोपी आसीफ उर्फ मब्बा अकील अहमद व रप अब्दूल उर्फ कट्टा की मदद से वारदात को अंजाम दिया।पता चला है कि वालीव थाने के रिकॉर्ड में आरोपी ने एक और अपराध किया है। गिरफ्तार आरोपी के पास से उक्त अपराध की सामग्री जब्त की गई है,पुलिस दो मामलों की गुत्थी सुलझा ली है जो मामला वालीव थाने में दर्ज है।

Scanned with CamScanner

# नवघर पुलिस ने लौटाया सामान पीड़ितों के चेहरे पर खुशियां

**भायंदर:** मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत नवघर पुलिस स्टेशन में वर्ष २०२२,२३ में हुए विविध अपराधो का पुलिस ने निस्तारण कर करीब १६ लाख ६० हजार का पुलिस ने माल बरामद कर पुलिस उपायुक्त जयंत बजवले के हाथो जब पीड़ितों को चोरी गया माल लौटाया तो लोग भावुक हो उठे तथा पुलिस के प्रति आभार प्रकट किया! भायंदर पूर्व के नवघर पुलिस स्टेशन में दर्ज विविध अपराधो को पुलिस ने कुशलता पूर्वक हल कर चोरियो



के मामले में बरामद ४१ मोबाइल,६ मोटर साइकिल,१ऑटो रिक्शा तथा नकद रकम बरामद कर नवघर पुलिस स्टेशन में एक कार्यक्रम का आयोजन कर शिकायतकर्ताओं को नवघर के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विजय पवार,पुलिस निरीक्षक अपराध सुशील शिंदे, पुलिस निरीक्षक प्रकाश मसाल, सहायक पुलिस निरीक्षक योगेश काले,सहायक पुलिस निरीक्षक अभिजीत लांडे तथा अन्य पुलिस कर्मियों की उपस्थिति में पुलिस उपायुक्त जयंत बजवले के हाथो पीड़ितों को बरामद मुद्दामाल वापिस किया तो पीड़ितों ने पुलिस के प्रति आभार प्रकट किया!

Scanned with CamScanner

लोकमत

# फटाका सायलेन्सरवर रोलर; तुम्हालाही होईल हजारोंचा दंड

## कायदा मोडून करतात वाहनात बदल : गर्भवती, ज्येष्ठांसह मुलांना होतो त्रास

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बुलेट गाडी असली म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण, असे अनेक जण मानतात. काही व्यक्ती स्वतः ची इमेज जपण्यासाठी बुलेट वापरतात. पण काहीजण या वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून ध्वनीप्रदूषण करत सामान्य जनतेच्या जीवितास धोका निर्माण होईल, असे कृत्य करतात मात्र स्वतःला प्रतिष्ठित म्हणवणाऱ्या व्यक्तींना हे शोभत नाही. बुलेटमधील सायलेन्सरच्या आवाजाने मुले, गर्भवती, ज्येष्ठ नागरिकांना आणि आजारी व्यक्तींना याचा त्रास होतो.

समजदारी म्हणून दंडात्मक कार्यवाही करूनही फरक पडत नसेल तर, आमच्याकडे गुन्हा दाखल करून कडक कार्यवाहीचे मार्ग उपलब्ध आहेत. गुन्हा दाखल झाला तर, अटक, जामीन, वाहन जप्ती, वाहनाची तपासणी, दोषारोप आणि शिक्षा या सर्व बाबींना सामोरे जावे लागेल, याची नोंद घ्यावी आणि वाहनातील अनधिकृत बदल काढून टाकावेत, असे आवाहन वाहतूक शाखेने केले आहे. गेल्या तीन महिन्यात अनेकांवर वाहतूक विभागाने कारवाई केली आहे.



### फटाका सायलेन्सर लावाल तर जबर दंड

फटाका सायलेन्सर लावून सुसाट वाहन पळविणाऱ्या बेशिस्त चालकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जातो आहे. फटाका सायलेन्सर लावून फिराल तर दोन ते पाच हजार रुपयांपर्यंतचा दंडदेखील होतो.

### सायलेन्सर जप्त करून ठोठावला 'फाइन'

वाहतूक पोलिसांनी फटाका सायलेन्सर लावलेल्या बुलेट, तसेच इतर वाहनांवर दंडात्मक कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त करीत फाइन लावला आहे.

### फटाका सायलेन्सरची रोडवरील संख्या वाढली

शहरातील काही रस्त्यावर सध्या फटाका सायलेन्सरची चांगलीच धूम सुरू आहे. दररोज काही बुलेटचालक फटाके फोडत दुचाकी पळवीत असल्याचे दिसते. पोलिसांनी असे सायलेन्सर जप्त करीत फटाके फोडत फिरणाऱ्या दुचाकीचालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.



### तीन महिन्यांत अनेक वाहनचालकांवर कारवाई

तीन महिन्यांत वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांकडून फटाका सायलेन्सर लावलेल्या अनेक वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. दररोज विविध शहरांत वाहतूक पोलिसांकडून स्पेशल ड्राईव्ह चालविल्या जात असून, वाहनधारकांत जनजागृती करण्याचे काम केले जात आहे.

### दररोज कारवाई होते आणि सुरूच राहणार

पोलिसांकडून दररोज दंडात्मक कारवाई केली जात आहे. लाखो रुपयांचा दंडही वसूल केला जात आहे. फटाके फोडत धावणाऱ्या दुचाकीवरदेखील दंडात्मक कारवाई केली जात आहे. ही कारवाई सुरू राहणार असून, फटाके फोडत दुचाकी चालवाल तर कठोर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. - वाहतूक विभाग



Scanned with CamScanner